
उत्सव

# अनुक्रमणिका


१. महाराष्ट्रातील नैसर्गिक वारसा स्थळ – कास पठार

- डॉ. गावित राजेश शिवाजी, डॉ. वाईकर मृणालिनी सचिन ---------- ७

२. शेतीमधील पीकपद्धती व पूरक व्यवसायावर कोविडचा झालेला परिणाम

- प्रा.डॉ.सदाशिव राजाराम बनकर, प्रा.डॉ.उध्दव मनोहर घोडके ---------- ११

३. तुळजापूर तालुक्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्याचे आर्थिक विश्लेषण

-प्रा. डॉ. अशोक भीमराव भोंग ---------- १४

४. ग्रामीण विकासापुढील आव्हानांचे वास्तव

-प्रा. नवनाथ नाथाराव इप्पर ---------- १७

५. डॉ.एम.एस.स्वामीनाथन यांचे कृषी क्षेत्रातील इनोवेशन्स

-डॉ.आत्माराम बाबुराव मुळीक ---------- २४

६. भारतीय अर्थव्यवस्था: स्त्री उद्योजकतेची भूमिका, समस्या आणि उपाययोजना

-डॉ. ए. एस. नलवडे ---------- २८

७. माण देशी महिला सहकारी बँकेच्या ठेवी व कर्जवाटपामुळे महिला उद्योजकतेचा झालेला विकास

-सौ.मनिषा सुरेश पवार ---------- ३२

८. किमान आधारभूत किंमतीचा कृषी उत्पादनावर प्रभाव

-श्री. निलेशकुमार गुरव ---------- ३७

९. आभासी चलन :– नव्या संधी आणि भविष्यातील दिशा

-प्रा. किशोर गजानन सुतार ---------- ४४

१०. हार्ड करंन्सी ते क्रिप्टो करंन्सी : मागोवा करन्सीच्या विकासाचा

-श्री. मारुती बाबुराव राठोड ---------- ५३

११. 'शाश्वत शेतीसाठी संशोधन व समग्र विकासाची आवश्यकता'

-डॉ. शेडगे डी. बी. ---------- ५९

१२. शिक्षणशास्त्र महाविद्यालयीन प्राध्यापकांचा नाविण्यपूर्ण अध्यापन पध्दतीविषयक दृष्टीकोन : एक अभ्यास

- श्रीमती नांगरे नूतन कृष्णराव, प्राचार्य डॉ.बालाजी जी.गिरगावकर ---------- ६५

ISSN No. 2394-5990

# महाराष्ट्रातील नैसर्गिक वारसा स्थळ - कास पठार

**डॉ. गावित राजेश शिवाजी**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
किसनवीर महाविद्यालय, वाई
चेल.९५६१४३८७८०
rajeshgavit1976@gmail.com

**डॉ. वाईकर मृणालिनी सचिन**
सहाय्यक प्राध्यापक
किसनवीर महाविद्यालय, वाई
चेल.९९२२२७४४७३
mrunaliniwaikar@gmail.com

**सारांश :**

भारतातील पर्यटन उद्योग हा मानवी संस्कृतीत पुरातन आहे. नवनवीन ऐतिहासिक नैसर्गिक धार्मिक सांस्कृतिक स्थळांना भेट देऊन त्यातून आध्यात्मिक समाधान व नाविन्य यांचा आनंद मिळवणे, माहितीचा शोध घेणे या हेतूने प्रवास करणे, राहते ठिकाणापासून काही काळ दूर राहणे म्हणजे पर्यटन होय. भारतातील मोठ्या उद्योगात पर्यटन उद्योगाचा समावेश होतो. पर्यटन हा अत्याधुनिक आर्थिक व्यवसाय आहे. औद्योगिक क्रांतीनंतर जगात पर्यटन बाजारपेठ अस्तित्वात येऊ लागले. ऐतिहासिक नैसर्गिक सांस्कृतिक पर्यटन स्थळे हा बाजार व्यवस्थेचा आधार असतो. पर्यटनाचा साधा अर्थ म्हणजे माणसाचे त्याच्या नेहमीच्या राहत्या ठिकाणाहून इतरत्र झालेले अल्पकालीन स्थलांतर होय.

भारत सरकारने सन १९५८ मध्ये स्वतंत्र पर्यटन मंडळाची स्थापना केली त्यानंतर जहासे समितीच्या शिफारशीची अंमलबजावणी करून १९६६ मध्ये भारतीय पर्यटन विकास मंडळाची महामंडळाची स्थापना झाल्यानंतर या उद्योगांचे वेगाने वाढ झाली. भारतात देशांतर्गत पर्यटन करणाऱ्यांची संख्या प्रतिवर्षी पंधरा टक्के वाढत आहे वाढणारे दरडोई उत्पन्न वाहतूक व दळणवळणाच्या तसेच निवासाच्या वाढत्या सोयी शिक्षण प्रसार जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोनातील बदल पर्यटन व्यवसाय संस्थांकडून संघटनांकडून उपलब्ध होणाऱ्या विविध आकर्षक सोयी सवलती यामुळे देशांतर्गत पर्यटकांच्या संख्येत वाढ होत आहे.

सातारा जिल्ह्यामध्ये गेल्या दशकात नव्याने उदयाला आलेले असेच एक पर्यटन स्थळ आहे ज्याचे नाव आहे कास पठार. या नयनरम्य व जैवविविधतेतून नटलेल्या कास पठाराचा अर्थात पुष्प पठाराचा अभ्यास या संशोधन लेखा मधून केला आहे. तसेच तेथील तथ्य व समस्यांचा अभ्यास केला आहे. कास पठाराला दरवर्षी भेट देणाऱ्या पर्यटकांची व त्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नाची सांख्यिकीय माहिती संकलित आहे.

**उद्दिष्टे :**

१. कास पठाराची संपूर्ण माहिती मिळवणे.

२. पठारा जवळील इतर पर्यटन स्थळांचा अभ्यास करणे.

३. कास पठारा बद्दल तथ्य व स्थानिक समस्या जाणून घेणे.

४. कास पठारावरील पर्यटकांची व उत्पन्नाची सांख्यिकीय माहिती मिळवणे.

**संशोधन पद्धती**

या संशोधनासाठी प्राथमिक माहिती कास पठाराला भेट देऊन याचबरोबर सांख्यिकीय विभाग, वनविभाग, सातारा यांच्याकडून पर्यटकांची संख्या व त्यांच्यापासून मिळणारे उत्पन्न याची माहिती गोळा केलेली आहे. तसेच दुय्यम माहिती कास पठार विषयी पुस्तकातून, लेखातून वार्षिक अहवालातून मिळवली आहे. तसेच यासंबंधी असणाऱ्या विविध वेबसाइट्स यावरून सांख्यिकीय माहिती संकलन केलेली आहे.

**प्रस्तावना :**

कास पठार साताऱ्याच्या पश्चिमेकडे साधारणपणे २२ किलोमीटर अंतरावर, महाबळेश्वरपासून ३७ किमी आणि पाचगणीपासून ५० किमी अंतरावर कास पठार हे अतिशय नयनरम्य ठिकाण आहे. या पठारावरील कास तलाव सातारा शहराला पाणीपुरवठा करतो. या पठारावर पावसाळा सुरू झाल्यावर असंख्य प्रकारची रानफुले फुलतात. अनेक दुर्मीळ प्रजाती येथे सापडल्याने या पठाराचा २०१२ साली युनेस्को जागतिक वारसा स्थळांच्या संरक्षित यादीत समावेश केला गेला आहे. जागतिक स्तरावर जशी सात आश्चर्ये निवडली गेली, त्याच धर्तीवर 'एबीपी माझा'ने महाराष्ट्रातूनही सेव्हन वंडर्स ऑफ महाराष्ट्र कार्यक्रमाद्वारे सात आश्चर्य निवडली, यांत कास पठार आहे. डॉ. जगदीश पाटील, डॉ. अरुण टिकेकर, राजीव खांडेकर, श्री. अरविंद जामखेडकर, डॉ. निशीगंधा वाड, श्री. विकास दिलावरी, श्री. व्ही. रंगनाथन या सात ज्युरींनी निवडलेल्या १४ आश्चर्यांपैकी सात आश्चर्यांची निवड करण्यात

आली. कास पठाराची समुद्रसपाटीपासूनची उंची १००० ते १२५० मीटर, आणि क्षेत्रफळ अंदाजे १० चौ.किमी आहे.

पुण्यापासून सुमारे १४० किमी अंतरावर असलेल्या या पठारावर ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात आकर्षक फुले येतात. या ठिकाणाला फुलांचा गालिचा देखील संबोधतात. इथे फुलांच्या आठशेहून अधिक प्रजाती आढळतात. हे पठार तब्बल एक हजार हेक्टर क्षेत्रात पसरले आहे. कास हा जैवविविधतेचा हॉटस्पॉट आहे. हे पठार त्यावर ऑगस्ट ते ऑक्टोबर या काळात फुलणाऱ्या विविध प्रकारच्या रानफुलांसाठी आणि फुलपाखरांसाठी प्रसिद्ध आहे. या पठारावर २८० फुलांच्या प्रजाती व वनस्पती वेली, झुडपे आणि इतर प्रजाती मिळून ८५० प्रजाती आढळतात. येथे आययूसीएनच्या प्रदेशनिष्ठ लाल यादीतील (International Union for Conservation of Nature and Natural Resources यांनी नष्टप्राय होण्याचा धोका असलेल्या घोषित प्रादेशिक प्रजातींची यादी) २८० पुष्प प्रजातींपैकी ३९ प्रजाती आढळतात. येथे सुमारे ५९ जातींचे सरिसृप (सरपटणारे प्राणी) आढळतात.

**कास पठाराची संपूर्ण माहिती :**

कोयना वन्यजीव अभयारण्याला लागून कास पठार आहे. इथं एक अतिशय सुंदर तलाव देखील आहे. या पठारात क्वचितच तीन-चार सेमी पातळ माती असते. त्याखाली एक दगड आहे. इथे खूप पाऊस पडतो. गर्दी पाहता सरकारने इथे दररोज तीन हजारांची संख्या निश्चित केली आहे. इथे आढळणारी फुले आणि वनस्पतींच्या इतर प्रजाती खूप मौल्यवान आहेत. याला व्हॅली ऑफ फ्लॉवर्स असेही म्हणतात. या पठारावर आणि कास सरोवरात अशी अनेक झाडे आहेत, जी इतरत्र कुठेही आढळत नाहीत. वनस्पतिशास्त्रज्ञ मोठ्या संख्येने येथे दिसतात. पर्यटनाच्या दृष्टीकोनातून सप्टेंबर-ऑक्टोबर हा काळ सर्वोत्तम मानला जातो.

व्हॅली ऑफ फ्लॉवर्स हे महाराष्ट्रातील सातारा शहरातील कास पठाराचे नाव आहे. हे महाराष्ट्राचे उत्तराखंडच्या प्रसिद्ध व्हॅली ऑफ फ्लॉवर्सच्या बरोबरीचे आहे. ओल्या हंगामाच्या शेवटच्या दोन महिन्यांत म्हणजे ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये दोन्ही खोऱ्यांमध्ये एकाच वेळी फुले येतात.

कास सरोवर, जे खोऱ्याला लागून आहे आणि कास पठाराच्या भव्यतेमध्ये आणखी एक चमकणारी खोली जोडते. मनोरंजक गोष्ट म्हणजे, तलावामध्ये बरीच फुले आहेत जी दरीत देखील नाहीत. पाण्याखालील वनस्पतींच्या विपुलतेमुळे कास सरोवर हौशी आणि तज्ञ वनस्पतिशास्त्रज्ञांसाठी एक अद्भुत सहल बनते. सातारा शहराच्या पश्चिमेकडील भागाला कास तलावातून नियमितपणे पाणी येते.

कास पठारावर फुलणाऱ्या फुलांचे रंग दर आठवड्याला अक्षरशः बदलतात असे म्हणतात. तिथं इतकी सूक्ष्म-आकाराची फुले आहेत की ती पाहण्यासाठी आणि त्यांचे छायाचित्र काढण्यासाठी गरुडाच्या सारखी तीक्ष्ण नजर लागते. जवळच कास सरोवर नावाचे एक सरोवर आहे, ज्याच्या फ्लॉवरबेडमध्ये सुंदर निळी फुले उमललेली आहेत..

पावसाळ्यानंतर, म्हणजे सप्टेंबर आणि ऑक्टोबरमध्ये, जेव्हा फुले पूर्ण बहरलेली असतात, तेव्हा कास पठारावर जाण्याचा सर्वात चांगला काळ असतो. सतत सूर्यप्रकाश असल्यास, पाऊस संपल्यानंतर एक किंवा दोन आठवड्यांनंतर फुले दिसायला लागतात..अगणित फुलांमध्ये बसून त्यांचे सौंदर्य अनुभवण्यासाठी वर्षाचा आदर्श काळ या महिन्यांत असतो जेव्हा हवामान देखील पर्यटनासाठी उत्तम असते. ढगाळ आकाशासह तापमान २० ते २५ अंशांच्या मध्यम श्रेणीत असते.

भारताच्या पश्चिम घाटाचा एक भाग असल्याने, कास पठार युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांमध्ये ओळखले जाते. युनेस्कोने या मुख्य पठाराला सुरक्षित ठेवण्यासाठी कुंपण घालणे निवडले आहे, जेणेकरून येथील फुलांना कोणतीही हानी होणार नाही आणि पर्यटकही त्यांच्यापासून सुरक्षित अंतरावर राहतील.याचे कारण सांगण्यात की हे सर्व करण्याआधी येथे येणारे पाहुणे या मैदानात फुटबॉल खेळत असत, त्यामुळे येथील लहान मोहोरांचे आणि फुलांचे नुकसान होते. या पठारावर इकडे तिकडे काही रस्ते तयार करण्यात आले आहेत, जेणेकरून लोकांना या संपूर्ण पठारावर सहज फिरता येईल.

**कास पठाराला पोहोचण्याचे मार्ग पुढील प्रमाणे आहेत :**

**रस्ते वाहतूक :** NH ४ वर, कास पठार हे टॅक्सी आणि सार्वजनिक वाहतुकीच्या जवळ आहे. सातारा ते कास असा २२ किमी प्रवास करणाऱ्या काही राज्य बसेससह सार्वजनिक वाहतुकीने किंवा टॅक्सी भाड्याने घेऊन पठारावर पोहोचता येते

**हवाई वाहतूक :** पुणे, जे साताऱ्यापासून १२७ मैलांवर आहे आणि चांगल्या रस्त्यांची सोय आहे, सर्वात जवळचे विमानतळ आहे.

**रेल्वे वाहतूक :** कास पठारापासून २२ किलोमीटर अंतरावर असलेले सातारा हे सर्वात जवळचे रेल्वेमार्ग आहे.

**कास पठार राहण्याची सोय :** कास पठार आणि आजूबाजूचा परिसर फिरण्यासाठी व राहण्यासाठी अनेक एजन्सी आहेत. या एजन्सी राहण्याचा, खाण्याचा व फिरण्याचा एकत्रितपणे योजना तयार करून पर्यटकांचा ताण कमी करते. याव्यतिरिक्त या ठिकाणी अनेक पंचतारांकित हॉटेल्स आणि रिसॉर्ट उपलब्ध आहेत.

**प्रवेश शुल्क :** प्रती व्यक्ती रू.१५०/- ऑनलाईन बुकींग केल्यास प्रिंट असणे अनिवार्य , मोबाइल स्क्रीनशॉट ग्राह्य समजले जात नाही. (१२ वर्षांखालील मुलांना प्रवेश मोफत).

 ISSN No. 2394-5990

**पार्किंग व बससेवा :** मोफत (पार्किंग पासून पठारावर जाण्यासाठी बससेवा उपलब्ध आहे.)

शालेय / महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विशेष सवलत : शुल्क प्रति व्यक्ती रु.४०/-. शाळा / कॉलेज प्रमुखांचे पत्र अनिवार्य. पत्र नसल्यास सवलत दिली जाणार नाही. शनिवार, रविवारी सवलत दिली जात नाही.

**गाईड सुविधा :** शुल्क - रु.१००/- प्रति तास व दहा व्यक्तींसाठी एक गाईड दिला जाईल.

**सायकल राईड:** शुल्क रु.५०/- प्रती तास या राजमार्ग ते कुमुदी तलावापर्यंत जाण्यासाठी आहेत.

**कास पठारा जवळील इतर पर्यटनस्थळे :**

साताऱ्याला निसर्गाचे वरदान लाभले आहे. कास-भांबवली-तापोळा- महाबळेश्वर- पाटण हा परिसर सदाहरित जंगलाने व्यापलेला आहे. याच पश्चिम घाटाच्या डोंगराळ भागात कोयनेचा शिवसागर जलाशय, भांबवली, वजराई धबधबा, युनेस्को पुरस्कृत कास पुष्प पठार, तसेच प्रतापगडसारखे गड/किल्ले आहेत. या सदाहरित जंगलामध्ये पर्यटक अस्सल जैवविविधतेचा अनुभव घेतात. कासचे पुष्प पठार, चाळकेवाडी पवनचक्कीचे पठार, पाचगणीचे टेबललँड या पठारांना सडा असे संबोधितात.

गर्द झाडीतील डोंगर; कोयना, सोळशी व कांदाटी नद्यांचा त्रिवेणी संगम पहावयास मिळतो. उत्तरेकडे कास पुष्प पठार तर दक्षिणेकडे चाळकेवाडीचे पवनचक्कीचे पठार. हे सर्व भांबवलीच्या एकाच पुष्प पठारावरून पहावयास मिळते, अनुभवता येते.,

या पठारावर निसर्गाच्या सहवासाबरोबरच वन्यप्राण्यांचे दर्शन देखील होते. भेकरे, ससे दूरवर पळताना दिसतात. बिबट्या, अस्वलासारखे हिंस्त्र प्राणी देखील पठारावर येतात. त्यामुळे पर्यटकांनी काळजी घेणे आवश्यक आहे. पठारावर खूप ठिकाणी निसरडे झालेले असते. त्यामुळे घसरण्याची शक्यता असते.

कास पठाराच्या दक्षिणेला कास तलाव आहे. कास तलावाच्या भोवताली घनदाट जंगल आहे. ते सज्जनगड आणि कण्हेर धरण यांच्यामध्ये आहे. कास तलावाच्या दक्षिणेला ३० किमी अंतरावर कोयना प्रकल्प आहे. तलावाच्या जवळच भांबवली वजराई धबधबा आहे.कास पठाराजवळ कुमुदिनी तलाव आहे.

**कास पठार बद्दल तथ्य व स्थानिक समस्या :**

कास पठाराला भेट देण्यापूर्वीप्रथम तुमची ऑनलाइन नोंदणी आणि बुकिंग पूर्ण करणे आवश्यक असते. पाच वर्षांखालील मुलांना शुल्क भरावे लागत नाही, जे १५० रुपये आहे.

**संपूर्ण आठवड्यात:** ५० INR (१२ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या अभ्यागतांसाठी)

आठवड्याचे शेवटचे दिवस आणि सरकारी सुट्ट्या: खर्च १५० प्रति वर्ष (१२ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या अभ्यागतांसाठी)

ज्येष्ठ: मुक्त; वय पडताळणी म्हणून सरकारी ओळख आवश्यक आहे.

पार्किंगसाठी कोणतेही शुल्क नाही, तथापि दररोज ३,००० लोक मर्यादित आहेत.

जाण्यासाठी सर्वोत्तम वेळ: सप्टेंबरच्या मध्यापासून ते ऑक्टोबरच्या अखेरीपर्यंत

सर्वात जवळचे रेल्वे स्टेशन सातारा आहे आणि तिथून तुम्ही खाजगी ऑटोमोबाईलने तिथे पोहोचू शकता. सार्वजनिक वाहतूक मर्यादित पुरवठा आहे.

खूप कमी प्रवेश शुल्क; कॅमेऱ्यांसाठी अतिरिक्त खर्च लागू.

पार्किंग प्रवेशद्वारापासून १.५ किलोमीटर अंतरावर आहे.

प्रवास कसा करायचा: फक्त पायी

कास पठारावर फूड स्टँड नाहीत.

कास पठारावर सार्वजनिक स्वच्छतागृहे नाहीत.

कास तलाव आणि धबधबे जवळ आहेत.

**कास पठाराच्या परिसरात काही स्थानिक समस्या निर्माण झाल्या आहेत त्या पुढील प्रमाणे आहेत :**

१. कासला हॉटस्पॉट हे नाव दिल्यामुळे ह्या पठाराच्या परिसरात मानवी हस्तक्षेप वाढला आहे. पर्यटकांचा ओघ प्रचंड प्रमाणात वाढल्याने अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. वन विभागाने नियंत्रणासाठी विविध उपाय केले आहेत. शुल्कवाढ केल्याने नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे. परंतु हे ठिकाण म्हणजे एका नंदनवनापेक्षा कमी नाही.

२. कास पठाराच्या परिसरात यवतेश्वर-कास मार्गावर ९६ अवैध बांधकामे आहेत. नुकतेच प्रशासनाने याचा आढावा पूर्ण केला. ही अवैध बांधकामे कासच्या जैवविविधतेला बाधा आणत असून जनतेने कास पुष्प पठाराच्या संवर्धनासाठी ठोस पावले उचलण्याची प्रक्रिया गतिमान केली आहे.

**१. सांख्यिकीय विभाग, वनविभाग, सातारा**

वरील सांख्यिकीय माहितीतून वर्ष २०१२ ते २०२३ कालावधीतील पर्यटकांची संख्या व प्रवेश शुल्क पासून त्यापासून मिळालेले उत्पन्न याची सांख्यिकीय माहिती मिळते. काही अपवाद वगळता पर्यटकांच्या संख्येत वाढ होत आहे असे दिसते. २०२० मध्ये कोरोना महामारीमुळे कास पठारावरील पर्यटनास बंदी होती त्यानंतर पुन्हा पर्यटनाला सुरुवात झालेली दिसते मात्र ह्या पर्यटकांची संख्या आकडा तुलनेने कमी आहे. तसेच २०२३ ची आकडेवारी उपलब्ध नाही.पर्यटकांच्या संख्येनुसार प्रवेश शुल्क सुद्धा कमी-जास्त झालेले दिसते. या

सांख्यिकीय माहिती

| अ.क्र. | वर्ष | पर्यटकांची संख्या | प्रवेश शुल्क पासून मिळालेले उत्पन्न (रुपयांमध्ये) |
|---|---|---|---|
| १ | २०१२ | ९०,००० | १८,००,००० |
| २ | २०१३ | १,३०,००० | २०,००,००० |
| ३ | २०१४ | १,००,००० | १,९०,००,००० |
| ४ | २०१५ | १,३५.००० | २०,००,००० |
| ५ | २०१६ | १,३७,००० | १२,००,००,००० |
| ६ | २०१७ | ८८,००० | ९०,००,००० |
| ७ | २०१८ | ९७,००० | १,१०,००,००० |
| ८ | २०१९ | ९३,९०४ | १,००,८२,००० |
| ९ | २०२० | - | - |
| १० | २०२१ | ९७,३०३ | १,११,५२,९६९ |
| ११ | २०२२ | ७१,३४२ | ६५,६७,७४० |
| १२ | २०२३ | - | - |

स्रोत – 1. Kaas Plateau : A World Natural Heritage Annual Report 2018.

उत्पन्नातून ५० टक्के रक्कम कास पठाराच्या विकासासाठी, ३० टक्के रक्कम रस्ते सुधारणा, पाणीपुरवठा अशा आधारभूत संरचनेसाठी खर्च होते तर २० टक्के रक्कम आयडीबीआय बँक यामध्ये मुदत ठेवीच्या स्वरूपात जमा केली जाते.

**निष्कर्ष :**

वरील संशोधनावरून काही निष्कर्ष काढता येतात.

१. कास हे निसर्गरम्य व जैवविविधतेने नटलेले क्षेत्र आहे त्याची आपण जोपासना केली पाहिजे.

२. कास पठारावरील स्थानिक समस्या दूर करण्यासाठी प्रयत्न केले गेले पाहिजेत.

३. कास पठारावरील पर्यटकांच्या संख्येत वाढ करण्यासाठी पर्यटन विभागाकडून जास्तीत जास्त माहितीचे स्रोत उपलब्ध केले पाहिजेत.

४. कास पठारावर अलीकडच्या काळात विदेशी पर्यटकांच्या संख्येत वाढ होत आहे त्यातून परकीय चलन उपलब्ध होत आहे यामध्ये अजून वाढ करणे शक्य आहे.

**स्रोत :**


१. पुष्प पठार कास– डॉ. संदीप श्रोत्री, प्रिंट ओम ऑफसेट २००९

२. सातारा जिल्हा गॅझेट २०२२

३. Kaas Plateau : A World Natural Heritage Annual Report 2018.

४. सांख्यिकीय विभाग, वनविभाग, सातारा

५. Satara Forest Department. Official Website of Satara Forest Department. Kas India.

६. India's Western Ghats gets World Natural Heritage Status, Also see: Newsletter, UNESCO New Delhi, Volume 5, Issue 3, July - Sept. 2014

७. Jump up to : a b Kaas to bloom for only 2,000 tourists daily - Pune -DN-. Dnaindia.com. 4 July 2012. Retrieved 1 May 2013.

८. Mr. Rajendra Shende, Chairman, TERRE, United Nations Environment Programme, Technologies and Policies, Ozon Action Programme, Multilateral Ozone Fund, Global Environmental Facility, Technology support programme, Multilateral Environmental Agreement, Intergovernmental Panel on Climate Change, Indian Institute of Technology. Terrepolicycentre.org. 15 -pril 2013. Retrieved 1 May 2013.